स.ब.वि.प्र. समाज संस्थेचे

# सहकार महर्षी भाऊसाहेब संतूजी थोरात महाविद्यालय संगमनेर.

## अर्थशास्त्र विभाग वार्षिक अहवाल २०२१ -२०२२

अर्थशास्त्र विभाग आणि पदव्युत्तर अर्थशास्त्र संशोधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने वर्षभरात विविध उपक्रमांचे आयोजन पुढील प्रमाणे करण्यात आले आहे. दि. 29 जानेवारी 2022 रोजी महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार आणि सद्यस्थितीतील उपयुक्तता या विषयावर प्रोफेसर डॉ. विजयकुमार वावळे सर यांच्या व्याख्यानाचे आयोजन सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांसाठी करण्यात आले.

दि. 9 फेब्रुवारी 2022 रोजी नेट-सेट कार्यशाळेचे आयोजन पदव्युत्तर वर्गाच्या कला, विज्ञान आणि वाणिज्य अशा सर्व विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आले. या कार्यशाळेसाठी गणेश थोरात, नानासाहेब दिघे, नीलम काळे, सचिन दोरगे या मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांना सेट - नेट विषयी मार्गदर्शन केले.

दि. 26 एप्रिल 2022 रोजी संगमनेर गारमेंट कंपनी संगमनेर येथे सर्व विद्यार्थ्यांसाठी क्षेत्रभेटीचे आयोजन करण्यात आले.

एम.ए. चा विद्यार्थी कु. सचिन कचेरे या विद्यार्थ्यांने संगमनेर तालुक्यातील शेतमजुरांचा आर्थिक व सामाजिक अभ्यास या विषयावर महाविद्यालयीन संशोधन समिती अंतर्गत संशोधन प्रकल्प डॉ. शोभा राहणे यांच्या मार्गदर्शनाखाली सादर करून संशोधन अनुदान प्राप्त केले.

अर्थशास्त्र संशोधन केंद्रांतर्गत या शैक्षणिक वर्षात चार विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची पीएचडी पदवी संपादन केली. अर्थशास्त्र संशोधन केंद्रांतील पीएचडी संशोधक विद्यार्थी कु. मयूर सुहास आव्हाड हा विद्यार्थी सेट परीक्षा उत्तीर्ण झाला. विभागातील प्रा. गणेश वाळुंज यांनी महाराष्ट्रातील पिक विमा योजनेचे आर्थिक चिकित्सक अध्ययन या विषयावर पुणे विद्यापीठाची पीएचडी पदवी संपादन केली.

अर्थशास्त्र विभागातील प्राध्यापकांनी सदर शैक्षणिक वर्षांमध्ये एकूण नऊ संशोधन पेपर प्रकाशित केले आहे.

Co-ordinator & Head,
Post Graduate Research Center in Economics
S. M. B. S. T. College, Sangamner

S. M. B. S. T. COLLEGE SANGAMNER

Principal
S.M.B.S.T. College Sangamner